<u>**प्रेस नोट दि. ०१/०५/२०२५**</u>

# मोलकरणीने केलेली ०९ लाख रुपयाची घरफोडी चोरी अवघ्या ०३ तासात शहर गुन्हे शाखेकडुन उघडकीस

इसम नामे- रमिज सलिम साबुनगर, वय- ३८ वर्षे, व्यवसाय- स्टिल व सिमेंट व्यापार, रा.- सिद्धेश्वर पेठ, जिल्हा परिषद दर्गासमोर, सोलापूर हे दिनांक २४/०४/२०२५ रोजी, राहते घरास कुलुप लावुन, लोणावळा येथे त्यांचे नातेवाईकांकडे गेले होते. त्यानंतर, दिनांक २६/०४/२०२५ रोजी, त्यांचे बंद घरातुन, धुर येवु लागल्याने, शेजारी राहणारे लोकांनी, रमिज साबुनगर यांना फोनद्वारे माहिती दिली. त्यानंतर, रमिजचे वडील सलिम साबुनगर यांनी घरी भेट देवुन पाहणी केली असता, घराचे मुख्य दरवाजाचे तसेच कम्पाऊंडचे कुलुप तसेच होते. दोन्ही दरवाजे व्यवस्थित बंद होते. मात्र, कुलुप काढुन घरात प्रवेश केल्यानंतर, लोखंडी अलमारीचे हॅन्डलला लावलेली प्लास्टीक कॅरी बॅग व त्यातील कादगपत्रे जळाल्याचे दिसुन आले. त्यानंतर, रमिज साबुनगर हे दिनांक २६/०४/२०२५ रोजी रात्रौ १२:०० वा. चे सुमारास घरी परतले. त्यावेळी, त्यांचे लक्षात आले की, लोखंडी अलमारीमध्ये ठेवलेले ९,००,०००/- रुपये रक्कम ही, त्या ठिकाणी नाही. त्यामुळे, कोणीतरी बनावट चावीचा वापर करुन, त्यांचे घरातील ९,००,०००/- रुपये चोरी केल्याची त्यांची खात्री झाली. त्यानंतर, रमिज साबुनगर यांनी, त्यांचे घराची चावी ज्या-ज्या लोकांकडे असते, त्यांचेकडे प्राथमिक चौकशी केली. मात्र, त्याबाबत त्यांना काहीही उपयुक्त माहिती मिळाली नाही. त्यांनतर त्यांनी, दिनांक २९/०४/२०२५ रोजी फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे, त्यांचे घरी ९,००,०००/- रुपयांची घरफोडी झालेबाबत तक्रार दिली. त्यानुसार, फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २७८/२०२५ भा.न्या.सं.कलम ३३१(३), ३०५ (ए), ३२६ (एफ) प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

सदरचा गुन्हा उघडकीस आणणेसाठी, गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी घटनास्थळाला भेट दिली. त्यानंतर, गुन्हे शाखेचे पोउपनि अल्फाज शेख व पथकातील पोलीस अंमलदार पोह/१३७९ बापू साठे, पोशि/१७२५ सुभाष मुंढे, पोशि/१७१२ सैपन सय्यद, पोशि/१६०२ वसिम शेख, महिला पोना/१३५८ ज्योती लंगोटे असे सर्वांनी, घटनास्थळाचे आजु-बाजुचे सुमारे ०१ किमी परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेजची पाहणी करुन, त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. त्यानुसार, पोउपनि अल्फाज शेख व त्यांचे तपास पथकाने, यातील वर नमुद फिर्यादी यांचे घरी काम करणारी मोलकरीण महिला नामे - फराना फारुख शेख हिला ताब्यात घेवुन,तिचेकडे सखोल व कौशल्याने तपास केला असता, तिने चोरी केलेली ९,००,०००/- रुपये रोख रक्कम ही, तिचे राहते घर- रेल्वे लाईन, लोणावत चाळ, मच्छी मार्केट समोर, फॉरेस्ट, सोलापूर या ठिकाणावरुन काढुन दिल्याने, ती रक्कम जप्त करुन, सदरचा गुन्हा ०३ तासात उघडकीस आणला आहे.

**सदरची कामगिरी, श्री.एम.राजकुमार, मा.पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, मा.पोलीस उपआयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्री.राजन माने, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर, श्री.सुनिल दोरगे, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, वसिम शेख, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, महिला अंमलदार निलाफर तांबोळी, सुमित्रा बारबोले, ज्योती लंगोटे, चालक पो.अंमलदार सतिश काटे, सायबर शाखेकडील पो.अमलदार प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.**

